## आजचे पंचांग

दिनांक : २९ सप्टेंबर २०२६ वार : मंगळवार माह (अमावस्यांत) : भाद्रपद माह (पूर्णिमांत) : आश्विन ऋतु : शरद आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : तृतीया तिथी (सायंकाळी ०५:०९ पर्यंत) त्यानंतर चतुर्थी तिथी नक्षत्र : अश्विनी नक्षत्र (सकाळी ०९:०२ पर्यंत) त्यानंतर भरणी नक्षत्र योग : हर्षण योग (३० सप्टेंबर सकाळी ०३:१९ पर्यंत) त्यानंतर वज्र योग करण : विस्ती भद्रा करण (सायंकाळी ०५:०९ पर्यंत) त्यानंतर भाव करण चंद्र राशी : मेष राशी सूर्य राशी : कन्या राशी अशुभ मुहूर्त: राहु काळ : दुपारी ०३:२८ ते सायंकाळी ०४:५८ पर्यंत

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

### एक्स्प्रेस वेवर तीन कंटेनरचा भीषण अपघात

**पुणे :** पुणे-मुंबई एक्स्प्रेस वेवर भयंकर अपघात झाला. शनिवारी दुपारी रसायन सदृश्य पदार्थ घेऊन जाणाऱ्या एका कंटेनरने दोन मालवाहू कंटेनरला धडक दिली. हा अपघात इतका भीषण होता की, तीन कंटेनर उलटले. तर एकाचा चक्काचूर झाला आहे. यात दोन जण जागीच ठार झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर दुपारी ही घटना घडली.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### करदात्यांना मोठा दिलासा; आयकर विवरणपत्राची अंतिम मुदत २१ नोव्हेंबरपर्यंत वाढवली

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

कर ऑडिट आणि आयकर विवरणपत्र भरण्याच्या प्रक्रियेत असलेल्या कंपन्या, व्यावसायिक आणि इतर करदात्यांना केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) आर्थिक वर्ष २०२५-२६ म्हणजेच मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आयकर विवरणपत्र भरण्याची अंतिम मुदत २१ दिवसांनी वाढवली आहे. त्यामुळे आधी ३१ ऑक्टोबर २०२६ असलेली अंतिम मुदत आता २१ नोव्हेंबर २०२६ करण्यात आली आहे.

आयकर कायदा, १९६१ अंतर्गत ज्या करदात्यांच्या खात्यांचे ऑडिट करणे बंधनकारक आहे, त्यांना या मुदतवाढीचा थेट लाभ मिळणार आहे. सीबीडीटीने २८ सप्टेंबर रोजी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकातून ही माहिती दिली.

कर ऑडिट अहवाल तयार करणे, आर्थिक नोंदींची पडताळणी करणे, विविध व्यवहारांची जुळवाजुळव करणे आणि त्यानंतर आवश्यक आयकर विवरणपत्र दाखल करणे या प्रक्रियेसाठी करदाते आणि कर व्यावसायिकांवर दरवर्षी मोठा ताण असतो. त्यामुळे अंतिम मुदत वाढवल्याने प्रलंबित ऑडिट आणि कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळणार आहे.

मुदतवाढ मिळाली असली तरी करदात्यांनी शेवटच्या टप्प्यापर्यंत प्रक्रिया लांबवू नये, असा व्यावहारिक सल्ला कर क्षेत्रातील तज्ज्ञांकडून दिला जात आहे. विशेषतः आर्थिक नोंदी, कर विवरणपत्रातील माहिती आणि ऑडिट अहवालातील आकडे यांची अचूक जुळवाजुळव करून वेळेत प्रक्रिया पूर्ण करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# सरकारविरोधी मजकुरावर लक्ष, पण लहान मुलांच्या सोशल मीडियाचे काय?

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

माध्यमांवर नियंत्रण, सरकारविरोधी मजकूर आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील आशय यावरून राजकीय चर्चा सातत्याने सुरू असताना आता सर्वोच्च न्यायालयाने समाजातील सर्वात संवेदनशील घटकांपैकी एक असलेल्या मुलांच्या सोशल मीडिया वापराचा प्रश्न केंद्र सरकारसमोर ठेवला आहे. अल्पवयीन मुलांना सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सहज खाते उघडता येत असल्याबद्दल गंभीर चिंता व्यक्त करत न्यायालयाने केंद्राने ठोस नियम केले नाहीत, तर माहिती तंत्रज्ञान कायद्यांतर्गत स्वतः निर्देश देण्याची वेळ येऊ शकते, असे स्पष्ट केले.

'जस्ट राइट्स फॉर चिल्ड्रन अलायन्स'च्या याचिकेवर सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. १२ ते १५ वर्षांच्या मुलांनाही सोशल मीडिया खाते उपलब्ध होत असल्याबद्दल न्यायालयाने चिंता व्यक्त केली. सोशल मीडिया मध्यस्थांनी भारतीय कायद्याशी सुसंगत पद्धतीने वयोमर्यादा आणि सदस्यत्वाची व्यवस्था करावी, असे न्यायालयाने अधोरेखित केले.



सरकारच्या वतीने सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी हा विषय डिजिटल वैयक्तिक माहिती संरक्षण कायद्याच्या चौकटीत येऊ शकतो, असे सांगितले. मात्र याचिकाकर्त्यांचे वरिष्ठ वकील एच. एस. फुलका यांनी संबंधित कायदा अद्याप पूर्णपणे लागू झालेला नसल्याचा मुद्दा मांडला. मुलांच्या सोशल मीडिया खात्यांसाठी पालकांची संमती आणि मध्यस्थांशी होणाऱ्या करारांमध्ये पालकांची भूमिका निश्चित करण्याची गरज असल्याचेही सुनावणीत पुढे आले.

याच ठिकाणी केंद्र सरकारच्या डिजिटल धोरणासमोर मोठा प्रश्न उभा राहतो. सरकारविरोधी मजकूर, राजकीय टीका किंवा माध्यमांवरील आशय याबाबत नियमनाची चर्चा होत असताना मुलांपर्यंत पोहोचणाऱ्या अश्लील, हिंसक, दिशाभूल करणाऱ्या किंवा वयाला अयोग्य डिजिटल आशयाबाबत प्रभावी यंत्रणा किती सक्षम आहे, हा प्रश्न आता सर्वोच्च न्यायालयानेच अधोरेखित केला आहे.

मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे वैयक्तिक लक्ष केवळ सरकारविरोधी माध्यमांपुरते मर्यादित आहे,. त्याऐवजी केंद्र सरकारने मुलांच्या डिजिटल सुरक्षेसाठी किती स्पष्ट, अंमलबजावणीक्षम आणि तातडीचे नियम केले आहेत, हा तपासण्याजोगा सार्वजनिक प्रश्न आहे.

माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ७९ अंतर्गत मध्यस्थांना मिळणाऱ्या संरक्षणाचाही सर्वोच्च न्यायालयाने संदर्भ दिला. प्रश्न आता एवढाच नाही की सोशल मीडियावर काय बोलले जाते; प्रश्न हा आहे की मुलांचे बालपण, मानसिक सुरक्षितता आणि डिजिटल गोपनीयता सुरक्षित ठेवण्यासाठी राज्याची जबाबदारी नेमकी कुठे सुरू होते आणि प्लॅटफॉर्मची कुठे?

## विलीनीकरणाच्या चर्चेला शरद पवारांचा 'ब्रेक'; आमच्यात यायचं असेल तर या!

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**मुंबई : वृत्तसंस्था**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य विलीनीकरणाबाबत गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चांना शरद पवारांनी सोमवारी स्पष्ट शब्दांत उत्तर दिले. मुंबईतील पक्षाच्या प्रमुख नेते आणि पदाधिकाऱ्यांच्या बैठकीनंतर पवारांनी आम्ही कुठेही जाणार नाही. तुम्हाला यायचं असेल तर आमच्यात या, अशी भूमिका मांडली. त्यामुळे शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस भाजपप्रणीत एनडीएमध्ये जाणार किंवा दुसऱ्या गटात विलीन होणार, या चर्चांना सध्या तरी त्यांनी पूर्णविराम दिला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत झालेल्या भेटीनंतर शरद पवारांच्या पुढील राजकीय भूमिकेबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले होते. दोन्ही राष्ट्रवादी एकत्र येऊन त्यानंतर एनडीएत सहभागी होण्याची शक्यता चर्चेत होती. मात्र, सोमवारी पवारांनी आपला पक्ष स्वतंत्रपणे मजबूत करण्याची भूमिका स्पष्ट केली.

या वक्तव्यामुळे राजकीय संदेशही स्पष्ट झाला आहे विलीनीकरण झाले तर ते शरद पवारांच्या



पक्षात येण्याच्या अटीवरच, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीकडून मात्र मंत्री अनिल पाटील यांनी कोणत्याही पक्षात विलीन होणार नसल्याचे म्हटले आहे. त्यामुळे दोन्ही बाजूंच्या भूमिकांमध्ये सध्या स्पष्ट अंतर दिसत आहे.

दरम्यान, दुष्काळाच्या मुद्द्यावरही पवारांनी सरकारवर टीका केली. २६५ तालुक्यांत दुष्काळ जाहीर करूनही उपाययोजना अपुऱ्या असल्याचा त्यांचा आरोप आहे. केळी उत्पादकांना मदत न मिळाल्याचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या चर्चेला पवारांनी ब्रेक लावला असला, तरी पुढील राजकीय समीकरणे आणि दोन्ही गटांची पुढची भूमिका आता अधिक महत्त्वाची ठरणार आहे.

## पवित्र पोर्टलवर निवड, तरी नोकरीसाठी लाखोंची मागणी!

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**छत्रपती संभाजीनगर/बीड**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाने शिक्षक भरतीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी सुरू केलेल्या 'पवित्र पोर्टल'च्या प्रक्रियेलाच आता खासगी संस्थाचालकांकडून कथितपणे हरताळ फासला जात असल्याचे गंभीर आरोप समोर येत आहेत. टीईटी आणि टीएआयटीच्या आधारे गुणवत्तेनुसार निवड झाल्यानंतरही संबंधित उमेदवारांकडे नियुक्तीसाठी लाखो रुपयांची मागणी केली जात असल्याच्या तक्रारी विदर्भासह मराठवाड्यातील काही खासगी शाळांबाबत पुढे आल्या आहेत.

विदर्भातील एका खासगी शिक्षण संस्थेत पवित्र पोर्टलद्वारे निवड झालेल्या शिक्षकाकडे पदभार देण्यासाठी पैशांची मागणी झाल्याचा आरोप आहे. संबंधित उमेदवाराने शिक्षण विभागाकडे तक्रार केली; मात्र तक्रारीनंतर भविष्यात सेवेत त्रास, कायमस्वरूपी नियुक्तीत अडथळे किंवा अन्य प्रकारे नुकसान केले जाईल, अशी भीती त्याने व्यक्त केली आहे. तक्रार मागे घेण्यासाठी दबाव आणला जात असल्याचीही चर्चा आहे.

बीड, जालना, परभणी, नांदेड आणि छत्रपती संभाजीनगर परिसरातील काही खासगी अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्येही अशाच प्रकारच्या आर्थिक मागण्यांचे आरोप उमेदवारांकडून केले जात आहेत. 'शासनाने निवड केली असली तरी शाळेत जागा देण्याचा अंतिम अधिकार आमचा,' असा दावा करून उमेदवारांची कथित आर्थिक अडवणूक केली जात असल्याचे सांगितले जाते. पवित्र पोर्टलचा उद्देशच शिक्षक भरतीतील वशिलेबाजी आणि गैरप्रकाराला आळा घालणे हा असताना, नियुक्तीच्या टप्प्यावरच उमेदवारांची कथित पिळवणूक होत असेल तर या यंत्रणेच्या अंमलबजावणीवर गंभीर प्रश्न निर्माण होतात. उमेदवारांच्या तक्रारींची गोपनीय चौकशी करून दोषी संस्थांवर कठोर कारवाई करण्याची मागणी डीटीएड, बीएडधारक संघटना आणि उमेदवारांकडून होत आहे. नियमानुसार शिफारस झालेल्या उमेदवाराला विनाअट रुजू करून घेणे अपेक्षित आहे. मात्र, कारवाईची भीती असतानाही तोंडी पैशांची मागणी केली जात असल्याचे आरोप आहेत. तक्रार केल्यास नोकरीतच त्रास होईल,

## महाराष्ट्रात दुष्काळाची पाहणी पुन्हा सुरू; शेतकऱ्यांच्या जखमेवर पाहणीचा मीठ?

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**मुंबई : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना आता केंद्र सरकारचे पथकही राज्याच्या पाहणीसाठी येणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यातील अनेक मंत्र्यांनी दुष्काळग्रस्त भागांचा दौरा केल्यानंतर केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याणमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्रात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. ३ ऑक्टोबरनंतर केंद्रीय पथक राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

प्रशासनाच्या अहवालानुसार, ट्रिगर-१ परिस्थिती असलेल्या २५६ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. मराठवाड्यासह विदर्भातील अनेक भागांमध्ये पावसाअभावी पिके आणि पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. अशा परिस्थितीत केंद्रीय पथकाकडून प्रत्यक्ष पाहणी होणार आहे. राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियान २०२६च्या उद्घाटन सत्रात चौहान यांनी रब्बी हंगामाचे नियोजन उपलब्ध पाणी, जमिनीतील ओलावा आणि सिंचनाची उपलब्धता लक्षात घेऊन करण्याचे आवाहन केले. पाणीटंचाईच्या भागात कडधान्ये आणि तेलबियांना प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या पिकांचा विस्तार, बियाणे-खते आगाऊ उपलब्ध ठेवणे आणि शेतकऱ्यांना पीक व्यवस्थापनाचे मार्गदर्शन करण्यावरही भर देण्यात आला. पण शेतकऱ्यांसमोरचा प्रश्न भाषणांचा किंवा पाहणी दौऱ्यांचा नाही; प्रश्न आहे तातडीच्या मदतीचा. पंचनामे, नुकसानभरपाई, पाण्याची उपलब्धता, चारा आणि पीकविमा याबाबत ठोस निर्णय कधी होणार, हा मुद्दा कायम आहे.

## रात्र वैऱ्याची आहे, सतर्क राहा, जरांगेंचा सरकारवर हल्लाबोल; सरकारला पुन्हा आंदोलनाचा इशारा

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीवरून मराठा आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर पुन्हा जोरदार टीका केली आहे. सरकारकडून गोड बोलून वेळकाढूपणा सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला. त्याचवेळी, ज्याला आपण मित्र मानत होतो, तोच आपला शत्रू निघाला, असा दावा करत आपल्या विरोधात मोठे कारस्थान रचले जात असल्याचेही जरांगे यांनी म्हटले आहे.

मराठा आरक्षणाच्या अंमलबजावणीत टाळाटाळ झाल्यास समाजाच्या संयमाचा उद्रेक होऊ शकतो, असा इशारा त्यांनी दिला. अनुकंपा तत्त्वावरील भरतीमध्ये नियुक्त्या रखडवू नयेत, तसेच जात वैधता प्रमाणपत्रे अडवून ठेवू नयेत, अशी मागणी त्यांनी केली. काही अधिकारी सरकार आणि समितीला चुकीची माहिती देत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आपल्यासह जवळच्या सहकाऱ्यांवर कारवाई करून त्रास दिला जात असल्याचा दावा करत, त्यामागचे धागेदोरे आपण शोधत असल्याचे जरांगे म्हणाले. आपल्या विरोधात अफवा पसरवल्या जात असून सत्ता आणि संपत्ती वाचवण्यासाठी हे राजकीय खेळ सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. मात्र, या आरोपांबाबत त्यांनी विशिष्ट व्यक्ती किंवा ठोस पुरावे सार्वजनिक केलेले नाहीत. दरम्यान, दुष्काळी परिस्थितीमुळे यंदाचा दसरा मेळावा छोटा ठेवला जाईल, असे त्यांनी सांगितले. दसऱ्यानंतर आंदोलनाचे पुढील नियोजन जाहीर केले जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

रात्र वैऱ्याची आहे, सतर्क राहा, असे आवाहन करत जरांगे यांनी आगामी काळात आंदोलनाची दिशा अधिक आक्रमक असण्याचे संकेत दिले.

# पेटंट मोठे की रुग्णाचे प्राण? महागड्या औषधांवर न्यायालयाला सरकारला जागे का करावे लागते?

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**मुंबई : : वृत्तसंस्था**

जीवन वाचवणारे औषध बाजारात उपलब्ध आहे; पण त्याची किंमत इतकी आहे की सामान्य रुग्णाला ते विकत घेणेच अशक्य होते. अशा वेळी प्रश्न केवळ औषधाच्या किमतीचा राहत नाही, तर आरोग्याचा अधिकार, राज्याची जबाबदारी आणि पेटंटच्या मक्तेदारीची मर्यादा यांचा होतो. केरळ उच्च न्यायालयाच्या २८ सप्टेंबर २०२६ रोजीच्या महत्त्वपूर्ण निर्णयाने हाच प्रश्न केंद्रस्थानी आणला आहे.

न्यायालयाने स्पष्ट केले की, पेटंट कायद्याच्या कलम १०० अंतर्गत केंद्र सरकारला पेटंटधारकाच्या संमतीशिवाय सरकारी उद्देशासाठी पेटंटयुक्त औषधाचा वापर करण्याचा अधिकार आहे. आवश्यक परिस्थितीत सरकार ते औषध तयार करून गरजू रुग्णांना गैर-व्यावसायिक पद्धतीने उपलब्ध करून देऊ शकते. मात्र, हा अधिकार वापरायचा की नाही, हा अंतिमतः केंद्राचा धोरणात्मक निर्णय असल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अधिक अस्वस्थ करणारी आहे. स्तनाच्या कर्करोगाच्या उपचारासाठी वापरल्या जाणाऱ्या **Ribociclib** या पेटंटयुक्त औषधाच्या किमतीवर प्रश्न उपस्थित करणारी याचिका दाखल झाली होती. संबंधित औषधाचा खर्च रुग्णांच्या आवाक्याबाहेर असल्याचा मुद्दा न्यायालयासमोर आला. मूळ याचिकाकर्त्या रुग्णाचा याचिका प्रलंबित असतानाच मृत्यू झाला; तरीही सार्वजनिक आरोग्याच्या व्यापक प्रश्नामुळे न्यायालयाने प्रकरण पुढे चालू ठेवले.

मग प्रश्न असा एखाद्या रुग्णाचा जीव वाचवणारे औषध उपलब्ध असताना, त्याची किंमत त्याला उपचारापासूनच वंचित करत असेल तर सरकारने नेमके कधी हस्तक्षेप करायचा?

आणि हा प्रश्न केवळ आजचा नाही. भारतात औषधांच्या किमती नियंत्रित करण्यासाठी **Drugs Price Control Order** आणि **National Pharmaceutical Pricing Authority** यंत्रणा अस्तित्वात आहे. जून-जुलै २०२६ पर्यंत **NPPA** ने शेकडो औषधांच्या **ceiling prices** निश्चित केल्या आहेत. सरकारच्या माहितीनुसार **NLEM-2022** मध्ये ३८८ आवश्यक औषधांचा समावेश आहे आणि २३ जुलै २०२६ पर्यंत ९३५ **scheduled formulations** साठी **ceiling prices** निश्चित करण्यात आल्या होत्या.

तरीही पेटंटच्या कक्षेबाहेरील किंवा विशिष्ट जीवनरक्षक औषधांच्या परवडण्याचा प्रश्न कायम राहतो. त्यामुळे केरळ उच्च न्यायालयाने केवळ कायद्याचा अर्थ लावला नाही; औषधांची प्रत्यक्ष उपलब्धता आणि परवडणारी किंमत याबाबत माहिती गोळा करून केंद्राने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी दिशा दिली आहे.

यातून मोदी सरकारच्या काळातील एक मूलभूत प्रश्न समोर येतो न्यायालयांनी वारंवार नागरिकांच्या मूलभूत गरजांकडे सरकारचे लक्ष वेधून द्यायचे का?

महामारीच्या काळातही सर्वोच्च न्यायालयाने केंद्राला पेटंट कायद्याच्या कलम ९२, १०० आणि १०२ अंतर्गत उपलब्ध अधिकारांचा वापर करून आवश्यक औषधांचे उत्पादन वाढविण्याचा विचार करण्यास सांगितले होते. त्या वेळीही सार्वजनिक हित आणि औषधांची उपलब्धता हा केंद्रस्थानी प्रश्न होता.

लोकशाहीत न्यायालय सरकारचे पर्याय ठरवत नाही; पण जेव्हा जीवन, आरोग्य आणि परवडणारा उपचार यांसारखे प्रश्न समोर येतात, तेव्हा घटनात्मक जबाबदारीची आठवण करून देणे ही न्यायालयाची भूमिका ठरते.

पेटंट हा संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी आहे; तो रुग्णाच्या उपचाराचा अडसर बनण्यासाठी नाही. औषध कंपन्यांचे बौद्धिक संपदा अधिकार महत्त्वाचे आहेतच. पण त्याच वेळी रुग्णाचा जीव, सार्वजनिक आरोग्य आणि औषधांची परवडणारी उपलब्धता यांचेही मूल्य ठरवावे लागेल.

आज खरी कसोटी सरकारसमोर आहे न्यायालयाने कलम दाखवून दिले आहे; आता केंद्र सरकार त्या कलमाचा सार्वजनिक हितासाठी वापर करते की पुन्हा फाईल, समित्या आणि आकडेवारीच्या मागे लपते?

कारण औषध बाजारात उपलब्ध असूनही रुग्णाच्या खिशाला ते परवडत नसेल, तर उपचाराची उपलब्धता कागदावर असते; प्रत्यक्षात ती आरोग्यव्यवस्थेची अनुपलब्धताच ठरते.

## संपादकीय

# न्यायालये वाढत आहेत, पण न्यायाधीश कुठे आहेत?

लोकशाहीत नागरिकाच्या हक्कांचे अंतिम संरक्षण न्यायव्यवस्थेकडून अपेक्षित असते. अन्याय झाला तर नागरिक न्यायालयाचा दरवाजा ठोठावतो. पण त्या दरवाजातून आत गेल्यानंतर न्यायासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागत असेल, तर प्रश्न केवळ न्यायालयीन प्रक्रियेच्या वेगाचा राहत नाही; तो संपूर्ण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेचा बनतो. महाराष्ट्रातील न्यायव्यवस्थेची सध्याची स्थिती याच कारणामुळे चिंताजनक आहे.

राज्यात ५,१९५ न्यायिक पदे मंजूर असताना केवळ २,११६ पदांवर अधिकारी कार्यरत आहेत. तब्बल ३,०७९ पदे रिक्त आहेत. म्हणजे मंजूर पदांपैकी जवळपास ५९ टक्के पदांवर अधिकारीच नाहीत. दुसरीकडे जिल्हा, सत्र आणि दंडाधिकारी न्यायालयांमध्ये ६१ लाखांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. प्रत्येक प्रलंबित खटला न्यायाधीशांच्या रिक्त पदामुळेच अडकलेला आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही. खटल्यांची संख्या, प्रकरणांची गुंतागुंत, सुनावण्यांचे वेळापत्रक, वकिलांची उपलब्धता आणि पायाभूत सुविधा अशा अनेक घटकांचा त्यावर परिणाम होतो. मात्र, न्यायदान करणाऱ्या यंत्रणेतील जवळपास ६० टक्के पदे रिक्त असतील, तर त्याचा परिणाम होत नाही असेही म्हणता येणार नाही.

या परिस्थितीचा विरोधाभास आणखी ठळक होतो तो मागील दशकाच्या आकडेवारीतून. २०१४ मध्ये महाराष्ट्रात १,९०९ न्यायिक पदे मंजूर होती आणि त्यापैकी १,६४३ पदे भरलेली होती. म्हणजे सुमारे ८६ टक्के पदांवर अधिकारी कार्यरत होते. २०२५ मध्ये मंजूर पदांची संख्या ५,१९६ पर्यंत वाढली; मात्र कार्यरत अधिकारी केवळ २,०५४ होते. २०२६ मध्ये मंजूर पदे ५,१९५ आणि कार्यरत अधिकारी २,११६. म्हणजे मंजूर पदांची संख्या वाढली, पण त्या तुलनेत मनुष्यबळ भरण्याचा वेग कमी राहिला.

कागदावर न्यायव्यवस्था विस्तारली; प्रत्यक्षात तिची मनुष्यबळाची क्षमता मात्र त्याच वेगाने वाढली नाही. हा विरोधाभास सरकारने गांभीर्याने तपासण्याची वेळ आली आहे.

मुंबई उच्च न्यायालयानेही या प्रश्नाकडे लक्ष वेधले आहे. १६ सप्टेंबर २०२६ रोजी दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी पदांच्या नियुक्त्यांशी संबंधित सुनावणीदरम्यान मुख्य न्यायमूर्ती महेश चंद्र त्रिपाठी यांनी रिक्त पदे तातडीने भरण्याची गरज अधोरेखित केली. भरती प्रक्रियेसाठी समिती स्थापन करण्यात आल्याचे आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी संबंधित प्रक्रिया पुढे नेली जात असल्याचेही समोर आले. न्यायालयाच्या स्तरावरूनच जर भरतीच्या गतीबाबत चिंता व्यक्त होत असेल, तर शासनाच्या प्रशासकीय यंत्रणेने आता याचे स्पष्ट उत्तर द्यायला हवे.

आणखी एक प्रश्न महत्त्वाचा आहे. आधीच ३,०७९ पदे रिक्त असताना आणखी सुमारे तीन हजार न्यायिक पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव नेमका कशासाठी? न्यायालयांची वाढती गरज लक्षात घेता नवीन पदे आवश्यक असू शकतात. मात्र, विद्यमान पदांवरील नियुक्त्याच वेळेत होत नसतील, तर नव्या पदांची घोषणा करून नागरिकांना न्याय मिळण्याचा वेग किती वाढणार?

पदनिर्मिती ही सुरुवात आहे; न्यायदानाची क्षमता निर्माण करणे हा खरा उद्देश आहे. त्यासाठी न्यायाधीशांबरोबरच न्यायालयीन कर्मचारी, इमारती, तंत्रज्ञान, नोंदव्यवस्था आणि इतर पायाभूत सुविधा आवश्यक आहेत. रिकाम्या खुर्च्यांची संख्या वाढवणे म्हणजे न्यायव्यवस्था मजबूत करणे नव्हे. त्या खुर्च्यांवर सक्षम मनुष्यबळ बसवणे आणि त्यांना आवश्यक सुविधा देणे ही खरी कसोटी आहे.

या विलंबाची किंमत मात्र सामान्य नागरिक मोजतो. मालमत्तेचा वाद असो, कामगाराचा हक्क असो, कौटुंबिक संघर्ष असो किंवा गुन्ह्यातील पीडितेला न्याय मिळवण्याचा प्रश्न असोन्यायालयातील प्रत्येक तारीख म्हणजे संबंधित कुटुंबासाठी आर्थिक खर्च, मानसिक ताण आणि अनिश्चिततेचा आणखी एक दिवस. 'तारीख पे तारीख' हा केवळ सिनेमातील संवाद राहू नये; तो नागरिकांच्या न्यायव्यवस्थेवरील अनुभवाचा भाग बनू नये.

महिला आणि बालकांवरील अत्याचारांच्या प्रकरणांसाठी जलदगती न्यायालयांची मागणी केली जाते. ती आवश्यक असू शकते. पण न्यायालयाला 'फास्ट ट्रॅक' नाव दिल्याने न्यायदान आपोआप जलद होत नाही. तेथे न्यायाधीश हवेत, कर्मचारी हवेत, सुनावणीसाठी सुविधा हव्यात आणि प्रकरणांचा प्रभावी व्यवस्थापन आराखडा हवा. अन्यथा जलदगती न्यायालयांची घोषणा आणि प्रत्यक्ष न्यायदान यांच्यातील अंतर कायम राहील.

म्हणूनच महाराष्ट्र सरकारने आता आश्वासनांपेक्षा कालबद्ध कृती आराखडा जनतेसमोर ठेवण्याची गरज आहे. ३,०७९ रिक्त पदांपैकी किती पदांची भरती प्रक्रिया सुरू आहे? प्रत्येक टप्प्यासाठी किती वेळ निश्चित केला आहे? जिल्हानिहाय किती पदे रिक्त आहेत? न्यायालयीन इमारती आणि कर्मचारी उपलब्ध आहेत का? नव्या पदांसाठी किती निधी लागणार आहे? या सर्व प्रश्नांची सार्वजनिक उत्तरे आवश्यक आहेत.

न्यायव्यवस्था ही सरकारच्या प्रशासकीय सोयीची बाब नाही. ती नागरिकाच्या घटनात्मक हक्काची हमी आहे. त्यामुळे न्यायाधीशांची रिक्त पदे ही केवळ सरकारी भरतीची आकडेवारी नाही; ती न्याय मिळण्याच्या क्षमतेशी संबंधित बाब आहे.

महाराष्ट्रात ५,१९५ पदे मंजूर आहेत, ३,०७९ रिक्त आहेत आणि कनिष्ठ न्यायालयांमध्ये ६१ लाखांहून अधिक खटले प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर आता प्रश्न एकच आहेन्यायालये किती वाढवणार, यापेक्षा न्याय देणारे हात किती वेगाने वाढवणार?

न्याय मागण्यासाठी न्यायालयात पोहोचलेला नागरिक पुन्हा न्यायाच्या प्रतीक्षेतच अडकला, तर लोकशाहीतील न्यायाचा अर्थच कमकुवत होतो. रिक्त पदे भरा, आवश्यक पायाभूत सुविधा उभारा आणि भरती प्रक्रियेला कालमर्यादा द्या. कारण न्यायाला विलंब झाला की त्याची झळ कागदावरच्या आकडेवारीला नव्हे, तर माणसाच्या आयुष्याला बसते.

# थेरगावात 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर'; १,५०० हून अधिक सफाई सेवकांचा सहभाग

### आरोग्य तपासणीसोबत सुरक्षित कामकाजाचे मार्गदर्शन; कुटुंबातील युवक-युवतींसाठी कौशल्यविकासाच्या संधींची माहिती

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी**

शहर स्वच्छ ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सफाई सेवकांच्या आरोग्याची नियमित तपासणी आणि सुरक्षित कामकाजाबाबत जनजागृती करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या वतीने 'स्वच्छता ही सेवा २०२६' अंतर्गत थेरगाव येथे 'सफाई मित्र सुरक्षा शिबिर' घेण्यात आले. या शिबिरात पाच क्षेत्रीय कार्यालयांतील १,५०० हून अधिक सफाई सेवकांनी सहभाग घेतला.

थेरगाव येथील कै. शंकरराव गावडे कामगार भवन येथे झालेल्या शिबिराचे उद्घाटन 'ग' क्षेत्रीय अधिकारी मुकेश कोळप यांच्या हस्ते झाले. यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार, उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, सहाय्यक आरोग्य अधिकारी श्रीराम गायकवाड, सुधीर वाघमारे, अंकुश झिटे, अतुल सोनवणे, राजू साबळे, शांताराम माने, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी आदी उपस्थित होते.

आरोग्याची मोफत तपासणी

शिबिरात सफाई सेवकांची हिमोग्लोबिन, रक्तदाब आणि मधुमेहाची मोफत तपासणी करण्यात आली. दैनंदिन कामाच्या धावपळीत आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठी संतुलित आहार, नियमित व्यायाम, योगासने, प्राणायाम, ताणतणाव व्यवस्थापन आणि वेळोवेळी आरोग्य तपासणी करण्याचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कामाच्या स्वरूपानुसार आवश्यक सुरक्षितता उपाय आणि आरोग्यविषयक सवयींची माहितीही देण्यात आली.

उपआयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी सफाई सेवकांचे काम शारीरिकदृष्ट्या आव्हानात्मक असल्याने संतुलित आहार, व्यायाम, योगासने आणि नियमित आरोग्य तपासणी आवश्यक असल्याचे सांगितले. आरोग्यविषयक समस्या प्राथमिक अवस्थेतच लक्षात आल्यास योग्य उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाय करणे शक्य होते, असे त्यांनी नमूद केले.



आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी नियमित तपासणीमुळे आरोग्याच्या समस्या सुरुवातीच्या टप्प्यात निदर्शनास येण्यास मदत होते. त्यामुळे आहार आणि ताणतणाव व्यवस्थापनाकडेही सफाई सेवकांनी लक्ष द्यावे, असे आवाहन केले.

**कुटुंबातील युवकांसाठी कौशल्य प्रशिक्षण**

सफाई सेवकांच्या आरोग्यासोबतच त्यांच्या कुटुंबातील युवक-युवतींना कौशल्यविकास आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी समाजविकास विभागाच्या वतीने 'लाईट हाऊस कौशल्य'चे माहिती केंद्र उभारण्यात आले होते.

१८ ते ३५ वयोगटातील युवक-युवतींसाठी उपलब्ध असलेल्या विविध मोफत कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रमांची माहिती वैशाली खरात यांनी दिली. लेखा सहाय्यक, विद्युत उपकरण दुरुस्ती, विक्री प्रतिनिधी, इलेक्ट्रिक वाहन तंत्रज्ञ, बँकिंग व वित्तीय सेवा, परिचर्या सेवा, संगणक नियंत्रित यंत्रचालक, माहिती विश्लेषण, चित्ररचना, हॉटेल व्यवस्थापन, दुचाकी दुरुस्ती, भ्रमणध्वनी दुरुस्ती, डिजिटल मार्केटिंग, वातानुकूलन व शीतकरण यंत्र दुरुस्ती यांसह विविध अभ्यासक्रमांची माहिती देण्यात आली.

या प्रशिक्षणातून रोजगाराच्या उपलब्ध संधी, अभ्यासक्रमांचे स्वरूप आणि प्रशिक्षणानंतरचे रोजगार पर्याय याबाबत युवक-युवतींना मार्गदर्शन करण्यात आले.

**३० सप्टेंबरला उर्वरित क्षेत्रीय कार्यालयांसाठी शिबिर**

'स्वच्छतेत सहभाग-स्वच्छ भारत, विकसित भारत' या मध्यवर्ती संकल्पनेनुसार राबविण्यात येत असलेल्या अभियानात सफाई मित्रांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात येत आहे. त्याचाच पुढील टप्पा म्हणून बुधवार, दि. ३० सप्टेंबर रोजी 'क', 'इ', 'फ', 'ह' आणि 'ल' या उर्वरित पाच क्षेत्रीय कार्यालयांतील सफाई सेवकांसाठी सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी म्हणाले, सफाई सेवक शहर स्वच्छ ठेवण्यासोबतच नागरिकांच्या आरोग्याच्या संरक्षणात महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यांच्या आरोग्याची नियमित तपासणी आणि सुरक्षिततेची काळजी घेणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. सफाई सेवकांचे आरोग्य जपणे म्हणजे शहराच्या आरोग्याची काळजी घेणे होय.

अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांनी बदलत्या रोजगाराच्या गरजांनुसार युवक-युवतींना कौशल्य प्रशिक्षण देणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. सफाई सेवकांच्या कुटुंबातील युवक-युवतींना त्यांच्या आवडी आणि क्षमतेनुसार प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी महापालिकेकडून प्रयत्न केले जात असल्याचे त्यांनी नमूद केले.

शिबिराचे प्रास्ताविक सहाय्यक आरोग्य अधिकारी अतुल सोनवणे यांनी केले. सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले, तर सुधीर वाघमारे यांनी आभार मानले.

## शहीद क्रांतिकारक भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त महापालिकेच्या वतीने अभिवादन



पिंपरी, दि. २८ सप्टेंबर २०२६ : शहीद क्रांतिकारक भगतसिंग यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. दापोडी चौकातील मुंबई-पुणे रस्त्यावरील भगतसिंग यांच्या पुतळ्यास महापौर रवि लांडगे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, उपआयुक्त आण्णा बोदडे आणि जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. भगतसिंग यांच्या देशाच्या स्वातंत्र्यासाठीच्या त्यागाचे आणि क्रांतिकारी विचारांचे स्मरण यावेळी करण्यात आले.

# दुष्काळाने महाराष्ट्र होरपळला

## सत्काराचे पुष्पगुच्छ नको, मुख्यमंत्री सहायता निधीस मदत करा!

**■ दैनिक राज्य लोकतंत्र**
**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील २६५ तालुके दुष्काळाच्या छायेत असताना शेतकऱ्यांच्या संकटाला हातभार लावण्यासाठी आता समाजानेही पुढे यावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केले. सत्कारासाठी पुष्पगुच्छ देण्याऐवजी मुख्यमंत्री सहायता निधीस मदत करा, अशी विनंती त्यांनी केली. बारामती सहकारी बँकेच्या ६५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत त्या सोमवारी बोलत होत्या.

राजमाता जिजाऊ सांस्कृतिक भवन येथे झालेल्या या सभेला सुनेत्रा पवार प्रमुख उपस्थित होत्या. अजित पवार यांच्या निधनानंतर बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेला त्यांची ही पहिलीच उपस्थिती होती.

सभेपूर्वी त्यांनी बारामतीतील विद्या प्रतिष्ठान परिसरातील अजित पवार यांच्या स्मृतिस्थळी अभिवादन केले.

यानंतर सभेत अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा देताना त्या भावुक झाल्या. अजितदादांशिवाय कोणतीही गोष्ट अपूर्ण वाटते, असे सांगताना त्यांना अश्रू अनावर झाले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली मागील पाच वर्षांत बारामती सहकारी बँकेने उल्लेखनीय काम केले असून, बँकेला ३८.८५ कोटी रुपयांचा निव्वळ नफा झाल्याचेही त्यांनी सांगितले.

# चाकणमध्ये बनावट सोन्याचा मोठा डाव उधळला!

### चाकण हादरले! बनावट सोन्याच्या ३ साखळ्या गहाण ठेवून सराफाला ४.४४ लाखांचा गंडा; पुन्हा ब्रेसलेट विकताना दोघांना बेड्या

चाकण:

बनावट सोने खरे असल्याचे भासवून सराफा व्यापाऱ्याला तब्बल ४ लाख ४४ हजार रुपयांना गंडा घालणाऱ्या दोघा भामट्यांवर उत्तर चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महात्मा फुले चौक येथील सिद्धनाथ ज्वेलर्समध्ये हा प्रकार घडला.

अभिजित पांडुरंग गडदळे (वय २२, मूळ रा. दहफळ, ता. केज, जि. बीड) आणि समिर सुरेश माने (वय ३३, रा. उल्वे, नवी मुंबई, मूळ रा. वडजुता, जि. सातारा) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींनी फिर्यादी विकासनाथा मारुते यांच्या दुकानात ५२.२७० ग्रॅम वजनाच्या ३ बनावट सोन्याच्या चेन खऱ्या भासवून गहाण ठेवल्या आणि ४ लाख ४४ हजार रुपये लाटले. त्यानंतर पुन्हा बनावट सोन्याचे ब्रेसलेट विकण्याच्या प्रयत्नात असतानाच हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेनुसार फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे

**पिंपरी चिंचवडमध्ये रक्तरंजित थरार!**

**''मुले झोपडपट्टीत राहून बिघडतात'' बोलल्याचा राग; चिंचवडमध्ये भररस्त्यात चालकावर किचनच्या चाकूने सपासप वार! आरोपी गजाआड**

चिंचवड:

'तुझ्या मुलांमुळे झोपडपट्टीतील इतर मुले बिघडत आहेत, त्यांना बाहेर राहण्यास सांग' अशी समज दिल्याचा राग मनात धरून एका तरुणाने चालकाच्या पोटात थेट किचनमधील चाकू खुपसून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना दत्तर्डीलक्षशलीं माकडगल्ली, चिंचवड येथे घडली.

या हल्ल्यात अंकुश पोपट नलावडे (वय ३५, रा. दत्तर्डीलक्षशलीं माकडगल्ली) हे गंभीर जखमी झाले आहेत. त्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार पिंपरी पोलिसांनी आरोपी अविनाश पोपट नलावडे याला तात्काळ अटक केली आहे. फिर्यादी व त्यांचा साथीदार घरासमोरील रस्त्यावर उभे असताना आरोपीने घरातून भाजी कापण्याचा चाकू आणून फिर्यादीच्या पोटात खुपसला. पिंपरी पोलिसांनी आरोपीविरोधात इछड कलम ११८(२), ३५२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.




**बावधनमध्ये बुलेटस्वाराचा निष्काळजीपणा!**

**चांदणी चौकात भरधाव रॉयल एनफिल्डचा भीषण अपघात; रस्त्यावर बेदरकार गाडी चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालकावर गुन्हा**

बावधन:

मुंबईकडून साताऱ्याकडे जाणाऱ्या मार्गावर टाटा शोरूमसमोर भरधाव आणि निष्काळजीपणे रॉयल एनफिल्ड (जी टी कॉन्टिनेन्टल ६५०) चालवून अपघातास कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालकावर बावधन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सर्वज्ञ आदिनाथ चौगुले (वय १८ वर्षे, रा. सुखसागरनगर, कोंढवा, मूळ रा. शनिवार पेठ, कोल्हापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव आहे. पोलीस शिपाई सागर पावड यांनी याप्रकरणी तक्रार दिली असून, भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यानुसार बेदरकार वाहन चालवल्याप्रकरणी कारवाई करण्यात आली आहे.

**अमूल दूध काळ्या बाजाराची पोलखोल भोवली!**

**पिंपरीत काळाबाजार उघडकीस आणणाऱ्यावर जीवघेणा हल्ला! ६० रुपयांचे दूध ३० रुपयात विकतानाचा व्हिडिओ काढल्याने नाकाचे हाड फोडले**

पिंपरी:

६० रुपये किमतीची 'अमूल' दुधाची पाकिटे चक्क ३० रुपयांत विकून काळाबाजार करणाऱ्यांचा व्हिडिओ मोबाईलमध्ये शूट केल्याने संतप्त झालेल्या टोळक्याने एका दूध एजन्सी चालकावर प्राणघातक हल्ला केला. या मारहाणीत फिर्यादीच्या नाकाचे हाड फॅक्चर झाले आहे.

ही घटना साई चौकाजवळ घडली असून, अमूल दूध एजन्सी चालक मोहन प्रकाश सबनानी (वय ४३) यांनी पिंपरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी जितु मायारामानी, हितेश मायारामानी, रोहण, परवेश यांच्यासह इतर चार अनोळखी इसमांवर गुन्हा दाखल केला आहे. टेम्पोतून दुधाची स्वस्तात विक्री होत असल्याचे पाहून कंपनीला माहिती देण्यासाठी सबनानी व्हिडिओ काढत होते. त्यावेळी आरोपींनी ''पहिले व्हिडिओ डिलीट कर'' असे म्हणत तोंडावर जोरदार बुक्क्यांचा ठोसा मारून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### ५ लाखांची मागणी, डॉक्टरवर हल्ल्याचा आरोप; 'बिग बॉस मराठी'च्या माजी स्पर्धकाविरोधात पोलिसांत गुन्हा

■ पुणे : प्रतिनिधी

पुण्यातील निवृत्त डॉक्टरांची तक्रार; पैशांच्या मागणीवरून वाद वाढल्याचा आरोप, मारहाणीच्या घटनेने खळबळ

पुणे : पुण्यात एका निवृत्त डॉक्टरांवर कथितरित्या झालेल्या मारहाणीच्या प्रकरणात 'बिग बॉस मराठी'च्या माजी स्पर्धकाविरोधात पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. डॉक्टरांकडून ५ लाखांची मागणी करण्यात आली आणि त्यातून झालेल्या वादाचे रूपांतर कथित हल्ल्यात झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आल्याची माहिती आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित निवृत्त डॉक्टर पुण्यात वास्तव्यास असून, पैशांच्या मागणीवरून त्यांच्यात आणि आरोपीमध्ये वाद झाला. त्यानंतर डॉक्टरांना मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेत डॉक्टरांना दुखापत झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आल्याची माहिती आहे. घटनेनंतर त्यांनी पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली.

